**-: प्रेस नोट :-** दिनांक १४/०७/२०२२

## महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला गुटख्याची बेकायदेशीररित्या वाहतूक करणाऱ्या मुख्य आरोपीतास अटक केलेबाबत

| | | |
|---|---|---|
| १ | कक्ष | कक्ष - ५, गु.प्र.शा., गु.अ.वि., कुर्ला (प.), मुंबई ७०. |
| २ | गु.नो.क्र. व कलम | गु.प्र.शा.,गु.र.क्र. ४५/२०२२ कलम ३६७, ३२६, ५०६(२), १२०(ब) ३४ भा.द.वि. |
| ३ | घटनास्थळ | पुर्व दृतगती मार्ग, साउथ बॉन्डवर, गोदरेज घोडागेट सिग्नल जवळ, विक्रोळी (पुर्व) मुंबई. |
| ४ | गुन्हा घडला दिनांक, वेळ | दिनांक ०७/०५/२०२२ रोजी १७:४० |
| ५ | गुन्हा दाखल दिनांक | दिनांक ०८/०५/२०२२ रोजी ०४.०२ वा. |
| ६ | अटक आरोपी संख्या | ३ पुरूष इसम |
| ७ | थोडक्यात प्रेस नोट | खालील प्रमाणे |

**गुन्हयाची थोडक्यात हकीकत :-** फिर्यादीने यातील आरोपी क्रमांक १, २ व ३ हे गुटखा सप्लाय करत असलेबाबत पोलीसांना माहिती दिल्याने आरोपी क्रमांक १ याने त्याबाबतचा राग मनात धरून फिर्यादींना लोखंडी रॉडने खांदयावर, पाठीवर वार केले तसेच त्याच्या सोबत असलेल्या इतर ३ इसमांनी हॉकीच्या स्टीकने फिर्यादींच्या हाता, पायावर व पाठीवर मारहाण केली. त्यानंतर त्यांनी फिर्यादीस जबरदस्ती मोटार कार मध्ये बसवून फिर्यादींचे अपहरण करून त्यांना शिवडी फाटक येथे सिमेंट गोडावुन येथे नेवुन तेथे त्यांना पुन्हा मारहाण करून फिर्यादीच्या उजव्या हाताच्या मनगटाजवळ फॅक्चर करून फिर्यादीस गंभीर जखमी केले. तसेच फिर्यादीस जीवे ठारे मारण्याची धमकी दिली म्हणुन फिर्यादींनी आरोपी क्रमांक १ व त्याच्या ३ मित्रांविरूद्ध फिर्याद दिल्याने त्याचा तसा सविस्तर जबाब नोंद करुन विक्रोळी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २३२/२०२२ कलम ३६७, ३२६, ५०६(२), ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

**तपास :-** सदरचा गुन्हा मा. वरिष्ठांच्या आदेशान्वये गुन्हे शाखा कक्ष ५ येथे वर्ग करण्यात आला आहे. गुन्हे शाखेच्या तपासाअंतर्गत निष्पन्न झाले की,

महाराष्ट्र राज्यात सन २०१२ पासुन गुटखा या पदार्थास बंदी असतानाही अटक आरोपी क्रमांक - ३ व त्याचे इतर साथीदार हे शासनाची दिशाभुल करून बेकायदेशिररित्या छुप्या मार्गाने महाराष्ट्रात व मुंबईत मोठया प्रमाणात गुटखा घेवुन येतात. त्यानंतर सदरचा गुटखा अटक आरोपी क्रमांक - ३ हा त्याचे सहकारी अटक आरोपी क्रमांक - १ व २ तसेच पाहिजे आरोपी यांच्या मदतीने पोलीसांची दिशाभुल करून छुप्या मार्गाने मुंबई सहीत महाराष्ट्रातील पान टपरीत चढया भावाने टेम्पोच्या मार्फतीने डिस्ट्रीब्युट करतात व त्यामार्गाने लोकांपर्यंत गुटख्याची विक्री केली जाते. सदरच्या गुटखा विक्रीत त्यांना फार मोठया प्रमाणात आर्थिक फायदा होतो. त्यामुळे सदर गुन्हयातील फिर्यादी यांनी पोलीसांना वेळोवेळी खबर देवुन त्यांचा गुटख्याचा लाखों रूपयाचा माल पकडवुन दिल्याने अटक आरोपी क्रमांक १, २, ३ व त्यांच्या अन्य साथीदारांविरूध्द जे.जे. मार्ग पोलीस ठाणे, शिवडी पोलीस ठाणे, व इतर पोलीस ठाणेस गुन्हे दाखल केलेले आहेत.

अशाप्रकारे पोलीस कारवाई अंतर्गत अटक आरोपी क्रमांक १, २ व ३ यांचे गुटख्याचे टेंम्पो पकडल्यामुळे मोठया प्रमाणात गुटखा आणी गाडया अडकुन राहील्यामुळे त्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होवून त्यांना बेकायदेशीररित्या गुटख्याची ट्रान्सपोर्ट करण्यास अडचण निर्माण झाली होती.

त्यामुळे सदर गुन्हयातील मुख्य आरोपी क्रमांक ३ व त्याचे इतर साथीदार अटक आरोपी क्रमांक १ व २ यांनी यातील फिर्यादी यांना मारहाण करून त्याला अद्दल घडविण्याचा कट रचला व ठरलेल्या कटा प्रमाणे अटक आरोपी क्रमांक १ याने पाहिजे आरोपीतांच्या मदतीने फिर्यादींचे अपहरण करून त्यास मारहाण करून गंभीर दुखापत केली. तसेच पोलीसांत खबर दिल्यास त्यास जिवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यामुळे सदरचा गुन्हा हा बेकायदेशिर गुटख्याची विक्री करून मोठया प्रमाणात आर्थिक फायदा करणाऱ्या टोळीशी संबंधीत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

अशापकारे महाराष्ट्र शासनाने बंदी केलेला गुटखा या पदार्थाची बेकायदेशीररित्या वाहतूक करून शासनाची दिशाभूल करणाऱ्या टोळीच्या मुख्य आरोपीतास गुन्हेगारी गुप्तवार्ता पथकाच्या मदतीने अटक करण्यास गुन्हे शाखा, कक्ष ९ च्या पोलीसांना यश मिळाले आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), मुंबई, श्री. सुहास वारके, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. एस. विरेश प्रभू, मा. पो. उप आयुक्त (प्रकटीकरण), श्री. बालसिंग राजपूत, मा. सहा. पो. आयुक्त (मध्य) श्री. नामदेव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष ९ चे प्र.पो.नि. घनश्याम नायर, म. पो.नि. सुतिना भोर यांनी केली आहे.